RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष ९, अंक १७] शनिवार, फेब्रुवारी २५, २०२३/फाल्गुन ६, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये ४.००

**असाधारण क्रमांक २६**

**प्राधिकृत प्रकाशन**

### जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर

**विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या नेमणूका**

**अधिसूचना**

क्रमांक गृह/का. १/टे. ४/विकाअ/कावि-१८६३/२०२२.— जिल्हाधिकारी, पालघर, जिल्हा पालघर ह्या निर्णयाद्वारे सोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पालघर जिल्ह्यातील " गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार " प्राप्त खालील व्यक्तींची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. ही नियुक्ती सामान्यतः आदेश निर्गमित केल्याच्या तारखेपासून नमूद व्यक्तींच्या वयाच्या ७० वर्षापर्यंत चालू राहील अथवा पुढील आदेश होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत अस्तित्वात राहील. तसेच राज्य शासनास / जिल्हाधिकारी, पालघर यांना विशेष कार्यकारी अधिकारी यांची ही नियुक्ती वरील कालावधी पूर्ण होण्यापूर्वी केव्हाही, कोणतेही कारण न देता संपुष्टात आणण्याचा अधिकार राहील.

**१. विशेष कार्यकारी अधिकारी पुढे उल्लेख केलेली कर्तव्ये पार पाडण्यास सक्षम राहतील :—**

(एक) विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती "मानसेवी" असल्यामुळे विशेष कार्यकारी अधिकारी यांना कोणतेही मानधन / वेतन/भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

(दोन) विशेष कार्यकारी अधिकारी यांना केवळ कागदपत्रांच्या साक्षांकनाचे अधिकार राहतील व त्यांनी मुळ कागदपत्रे प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय साक्षांकन करू नये. त्यांनी साक्षांकन करताना विहित रबरी शिक्क्यासह सही करून सही खाली दिनांक नमूद करावा. मूळ कागदपत्रांपेक्षा वेगळी माहिती नमूद असलेल्या कागदपत्रांवर विशेष कार्यकारी अधिकारी यांनी साक्षांकन करु नये. वेगळी माहिती असलेल्या कागदपत्रांवर जर "सत्यप्रत" म्हणून साक्षांकन केल्यास त्यामुळे होणाऱ्या सर्व प्रकारच्या परिणामाकरिता " विशेष कार्यकारी अधिकारी " म्हणून साक्षांकन करणारी व्यक्ती जबाबदार राहील. अशी घटना उघडकीस आल्यास त्या व्यक्तीची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून करण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल व तो / ती विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून पुनर्नियुक्तीस अपात्र असेल.

(तीन) विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तीची त्यांच्या घरावर / दुकानावर / कार्यालयावर स्वतःच्या नावासह " विशेष कार्यकारी अधिकारी " असा फलक लावावा. तथापि त्यांनी त्यांच्या कुठल्याही वाहनावर " विशेष कार्यकारी अधिकारी " असा उल्लेख करू नये. तसेच त्यांच्या नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यावर लागलीच त्यांनी सदर फलक काढावेत.

(चार) विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तींनी " ओळख परेड" तसेच " मृत्यूपूर्व जबानी " यासाठी उपस्थित राहू नये.

(पाच) विशेष कार्यकारी अधिकारी यांनी " उत्पन्नाचे प्रमाणपत्र " देऊ नये.

(सहा) नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर विशेष कार्यकारी अधिकारी यांनी साक्षांकनाचे काम करू नये व सर्व साहित्य संबंधित तहसिलदार यांचेकडे तात्काळ परत करावे, अन्यथा ते पुनर्नियुक्तीस अपात्र ठरतील. नियुक्ती कालावधी संपुष्टात आल्यानंतर विशेष कार्यकारी अधिकारी याने साक्षांकन केल्याचे निष्पन्न झाल्यास त्यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदविण्यात येईल.

(सात) विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती ही नमूद व्यक्तींच्या वयाच्या ७० वर्षापर्यंत चालू राहिल अथवा पुढील आदेश होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत अस्तित्वात राहील व त्यानंतर ती आपोआप संपुष्टात येईल. सदर नियुक्तीच्या कालावधीत त्यांनी कोणतीही नियमबाह्य कृती केल्यास किंवा त्यांचेविरुद्ध गुन्ह्याची नोंद आढळल्यास, त्यांना कोणत्याही न्यायालयाने नादार (bankrupt) जाहीर केले असल्यास, त्याचप्रमाणे कोणत्याही कारणाशिवाय सुद्धा, कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती मुदतपूर्व रद्द करण्यात येईल.

## अनुसूची

| अ.क्र. (१) | व्यक्तिचे नाव (२) | पत्ता (३) |
|---|---|---|
| १ | श्री. राजेश रमाकांत वर्तक | रा. ए/ २०४, लोकमान्य अपार्टमेंट, लोकमान्य नगर, पंचायती समोर, पालघर, ता. जि. पालघर. |

पालघर,
दिनांक ७ फेब्रुवारी २०२३.

**गोविंद बोडके,**
जिल्हाधिकारी, पालघर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.